# गणिताची अचूकता

आयन स्टुअर्ट यांनी सांगितलेल्या या गोष्टीवरून गणिताची अचूकता कशी असते हे लक्षात येईल. एक खगोलशास्त्रज्ञ, एक पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ आणि एक गणितज्ञ एकदा स्कॉटलंडमध्ये सुट्टीसाठी गेले होते. आगगाडीच्या खिडकीतून पाहताना त्यांना एका शेतात एक काळ्या रंगाची मेंढी दिसली.

''हे विलक्षण आहे,'' खगोलशास्त्रज्ञ म्हणाले, ''स्कॉटलंडमधल्या सगळ्या मेंढ्या काळ्या दिसतात!'' यावर पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ म्हणाले, ''नाही, नाही, तसे नाही. स्कॉटलंडमधील काही मेंढ्या काळ्या आहेत.'' गणितज्ञाने प्रथम आकाशाकडे डोळे लावले आणि मग ते उत्तरले, ''स्कॉटलंडमध्ये एक तरी शेत असे आहे, की त्यात एक मेंढी आहे आणि तिची एक बाजू काळी आहे!''

